वाचले :-

१. महाराष्ट्र शासनाच्या उद्योग , उर्जा व कामगार विभाग , मंत्रालय , मुंबई यांचेकडील दिनांक २४ फेब्रुवारी २०१५ ची अधिसुचना
२. महाराष्ट्र शासनाच्या उद्योग , उर्जा व कामगार विभाग , मंत्रालय , मुंबई यांचेकडील दिनांक २७ जानेवारी २०१७ ची अधिसुचना
३. मा. आयुक्त सो यांचेकडील आदेश क्र. काक/३/कावि/१५४/२०१८ दिनांक २८/०६/२०१८
४. कामगार उप आयुक्त, पुणे जिल्हा, पुणे यांचेकडील पत्र क्र. काउआ/अंमल/२८५५६ दिनांक १९/११/२०१९
५. दिनांक 12/02 /२०२० रोजीचा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८, कामगार कल्याण विभाग
क्रमांक - काक/३/कावि/ 84 /२०२०
दिनांक - 12/02/२०२०

**विषय** - कंत्राटी कामगारांचे किमान वेतन दराबाबत.

आदेश,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागामार्फत कंत्राटी पध्दतीने नेमलेल्या कामगारांना तसेच महानगरपालिकेसाठी सेवा देणा-या कंत्राटदारामार्फत नियुक्त केलेल्या कामगारांना / सफाई कामगारांना उपरोक्त वाचले क्र. १ व २ चे अधिसूचनेनुसार उपरोक्त वाचले क्र. ३ अन्वये किमान वेतन दर निर्धारीत केलेले आहेत. उपरोक्त वाचले क्र. १ च्या अधिसूचनेनुसार कामगारांच्या व्याख्या खालीलप्रमाणे आहेत .

१) **कुशल कामगार** - कुशल कामगार म्हणजे जो स्वत:च्या निर्णय शक्तीनुसार आपले काम कार्यक्षमतेने व जबाबदारीने पार पाडू शकतो असा कामगार.

२) **अर्धकुशल कामगार** - अर्धकुशल कामगार म्हणजे सर्वसाधारणपणे नित्याच्या स्वरुपाचे काम करतो की, ज्यामध्ये निर्णय घेण्याची फारशी गरज नसते. परंतु तुलनेने त्याला दिलेले छोटेसे काम की, ज्यामध्ये महत्वाचे निर्णय इतरांकडून घेतले जातात असे काम योग्य रीतीने पार पाडण्याची आवश्यकता असते. मर्यादित व्याप्तीचे नित्याचे काम पार पाडणे हेच त्याचे कर्तव्य असते.

३) **अकुशल कामगार**- अकुशल कामगार म्हणजे ज्यास लहानसा किंवा स्वतंत्र निर्णय घेणे आणि पूर्वानुभव असणे आवश्यक नाही. परंतु तरीही व्यावसायिक परिस्थितीची माहिती असणे आवश्यक आहे, असे साध्या कर्तव्य पालनाचा अंतर्भाव असलेले काम करणारा कामगार, त्याच्या कामासाठी शारीरिक परिश्रमाशिवाय निरनिराळया वस्तूंची किंवा मालांची त्याला चांगली माहिती असणे आवश्यक असेल.

कत्राटी कामगारांच्या किमान वेतनाबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागामार्फत नियमाधिन मुदतीसाठी वर नमूद केलेप्रमाणे नियुक्त केलेल्या सर्व कंत्राटी कामगारांना महाराष्ट्र शासनाच्या वाचले क्र. १ चे अधिसूचने नुसार खालीलप्रमाणे दरमहा किमान वेतन अदा करण्यात यावे.

| अ. क्र. | कामगाराचा प्रकार | मुळ वेतन र. रु. (१) | विशेष भत्ता र. रु. (२) | एकुण वेतन र. रु. |
|---|---|---|---|---|
| १ | कुशल कामगार | १४,०००.०० | ४,७६०.०० | १८,७६०.०० |
| २ | अर्धकुशल कामगार | १३,०००.०० | ४,७६०.०० | १७,७६०.०० |
| ३ | अकुशलकामगार | ११,५००.०० | ४,७६०.०० | १६,२६०.०० |

कंत्राटी कामगारांना मूळ वेतन (१) + विशेष भत्ता (२) या एकत्रित रक्कमेवर खालीलप्रमाणे भत्ते देय आहेत.

| अ. क्र. | तपशिल | मालकाचा हिस्सा |
|---|---|---|
| १ | घरभाडे (१ + २ यावर) | ५% |
| २ | ई.पी.एफ.<br>(एकूण वेतन र. रु. १५,०००/- पर्यंतच देय) | १३% |
| ३ | ई.एस.आय. (१ + २ + घरभाडे ५% यावर) | ३.२५% |
| ४ | बोनस (१ + २ यावर) | ८.३३% |
| ५ | रजा वेतन (१ + २) यावर | ५.७७% |
| ६ | कामगार कल्याण निधी (दरमहा) | रु. ६/- |
| ७ | सेवा शुल्क (१ + २) यावर<br>अथवा निविदा स्विकतीचे दराप्रमाणे | ५% |

१. ज्या कंत्राटी कामगारांचे किमान वेतन (मूळ वेतन + विशेष भत्ता) रक्कम रुपये १५,०००/- पेक्षा कमी आहे अशा कंत्राटी कामगारांच्या वेतनातून भविष्य निर्वाह निधीची वर्गणी कामगारांचा हिस्सा १२ टक्के तसेच मालकाचा हिस्सा १३ टक्के याप्रमाणे एकुण २५ टक्के भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडे जमा करणेत यावी. ज्या कंत्राटी कामगारांचे किमान वेतन रक्कम रुपये १५,०००/- पेक्षा जास्त आहे व त्यांची भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडील नोंदणी अथवा भविष्य निर्वाह निधी कोड क्रमांक नाही अशा कामगारांना भविष्य निर्वाह निधीची रक्कम देय राहणार नाही.

२. ज्या कंत्राटी कामगारांना भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडून स्वतंत्र यु.एन. (Unique Number) यापुर्वीच मिळाला आहे व त्या कामगाराचा भविष्य निर्वाह निधी पुर्वीपासून कपात करण्यात येत असेल अशा कामगारांचे किमान वेतन (मूळ वेतन + विशेष भत्ता) रक्कम रुपये १५,०००/- पेक्षा जास्त असले तरी सदर कामगारांचा भविष्य निर्वाह निधीचा हिस्सा १२ टक्के तसेच मालकाचा हिस्सा १३ टक्के याप्रमाणे

एकुण २५ टक्के रक्कम रक्कम रुपये १५,०००/- वर आकारुन भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडे जमा करणेत यावा.

३. ज्या कंत्राटी कामगारांना गणवेश देण्यात येतो त्या कामगारांना धुलाई भत्ता र. रु. १००/- देय राहील.

४. महानगरपालिकेसाठी सेवा पुरविणा-या सर्व कंत्राटदारांना भविष्य निर्वाह निधीचा स्वतंत्र कोड नंबर घेणे आवश्यक असेल.

५. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागाकडून एकत्रीत मानधनावर नेमलेल्या कंत्राटी कामगारांची भविष्य निर्वाह निधीची वर्गणी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा भविष्य निर्वाह निधी कोड क्रमांक PUPUNO305159000 वर जमा करण्याची दक्षता सर्व संबधीत विभागांनी घ्यावी.

६. कंत्राटदार संस्थांनी कामगारांचे मासिक हजेरीपत्रक, कंत्राटी कामगारांचा भविष्य निर्वाह निधी त्या त्या महिन्यात भरल्याबाबत मासिक हजेरीपत्रक, कामगारांच्या रिव्हेन्यू स्टॅम्प लावून त्यावर संबंधीत कामगारांची स्वाक्षरी असलेले वेतन रजिस्टर, कामगारांच्या यादीसह ई.सी.आर., ई.एस.आय. चलन, कामगार कल्याण निधी तसेच सर्व शासकीय लेव्हीची पुर्तता केलेबाबत तसेच संबंधीत कामगारांचे मागील महिन्याचे वेतन बँकेमार्फत Account payee Cross Cheque (रेखांकित धनादेश) द्वारेच अदा केल्याचा पुरावा दरमहा सादर केल्यानंतरच सदर कंत्राटदाराचे त्या महिन्याचे देयक अदा करण्याची दक्षता संबंधीत विभागांनी घ्यावी.

७. कंत्राटदाराने कामासाठी नेमलेल्या कामगारांचे मासिक वेतन दरमहा १० तारखेपर्यंत अदा करावे.

८. नियुक्त कामगारांचा हिस्सा म्हणून खालील तपशिलानुसार सक्षम प्राधिकारणाकडे भरणा करणे ठेकेदारावर बंधनकारक आहे.

| अ. क्र. | लागू असलेले कामगार कायदे | मालकाचा हिस्सा | कामगाराचा हिस्सा |
|---|---|---|---|
| १ | मुंबई कामगार कल्याण निधी अधिनियम, १९५३ (मासिक वेतन रु. ३०००/- च्या पुढे) | रु. ३६/- (प्रती ६ महिने) | रु. १२/- (प्रती ६ महिने) |
| २ | राज्य कामगार विमा अधिनियम, १९४८ | ३.२५ % | ०.७५ % |
| ३ | कामगार भविष्य निधी अधिनियम, १९५२ | १३ % | १२ % |

यासाठी कामगारांचे नांवे कामगार कल्याण निधी, ईएसआय व ईपीएफ महामंडळाकडे स्वतंत्र खाते क्रमांक घेवून त्या खात्यावर दरमहा वर्गणी (कामगार व मालक हिस्सा) जमा करण्याची जबाबदारी ठेकदाराची आहे. तसेच अशाप्रकारे कार्यवाही होते अगर कसे ? या बाबीची खातरजमा संबंधित खात्याकडील पर्यवेक्षकीय अधिका-यांनी करणे आवश्यक आहे.

९. ठेकेदारामार्फत कामगारांची नियुक्ती केली असेल तरच सेवाशुल्काची रक्कम देय राहील.

१०. कंत्राटी कामगारांना नियमानुसार साप्ताहिक सुट्टी तसेच मासिक वेतन चिठ्ठी देण्यात यावी.

११. कंत्राटदाराने नेमलेल्या कामगारांना कंत्राटदार किमान वेतन दराने वेतन अदा करीत असल्याबाबत संबंधीत विभागांनी वेळोवेळी तपासणी करुन खात्री करावी.

१२. किमान वेतन दरापेक्षा कमी दराने वेतन अदा करता येणार नाही. तसेच किमान वेतन दरापेक्षा कमी दराची निविदा स्विकृत करता येणार नाही. निविदा नोटीस सोबत अंदाजपत्रकीय दर (सर्व भत्त्यांसह) प्रसिध्द करावे.

१३. कंत्राटी कामगारांना आवश्यक सुरक्षा साधने पुरविण्याची जबाबदारी संबंधीत कंत्राटदाराची राहील. तथापि महानगरपालिकेच्या संबंधीत विभागाच्या पर्यवेक्षीय अधिका-याने कंत्राटदाराने कंत्राटी कामगारांना सुरक्षा साधने पुरवली आहेत किंवा कसे तसेच पुरवलेली सुरक्षा साधने कंत्राटी कामगार वापरतात किंवा कसे याबाबत तपासणी करावी.

१४. दर सहा महिन्यांची प्रसिध्द होणा-या विशेष भत्त्याबाबत कामगार कल्याण विभागाने परिपत्रक निर्गतकरुन महानगरपालिकेच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावे त्याप्रमाणे संबंधीत विभागांनी किमान वेतन दराची अदायगी करण्यात यावी.

१५. ज्या कंत्राटी कामगारांनी न्यायालयात दावे दाखल केलेले आहेत अशा कामगारांना प्रस्तुतचे किमान वतनाचे दर देय राहतील.

१६. दिनांक ०१.०७.२०१७ पासून लागू झालेल्या गुडस सर्व्हीस टॅक्स (Goods Service Tax) बाबत लेखा विभागाकडून माहिती घेऊन संबधीत विभागांनी पुर्तता करावी.

१७. भविष्य निर्वाह निधीची पुर्तता करणेबाबत सर्व प्रक्रीया पुर्ण करण्यासाठी लेखा विभागाने स्वतंत्र कन्सलटंटची नेमणुक करावी.

१८. सदरच्या आदेशाची अंमलबजावणी दिनांक ०१ / ०१ /२०२० पासून करण्यात यावी.

(श्रावण हर्डीकर)
आयुक्त
पिंपरीचिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८

प्रति – सर्व विभागप्रमुख / शाखाप्रमुख